**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 6 | Feb 2015**
**ISSN:- 2393-8900**

Research Article

# *संत कान्होपात्रा*

***भाग्यश्री पांडुरंग जाधव***

बी. ए. भाग ३ , इतिहास विभाग , श्री संत दामाजी महाविदयालय.

***सांराश :***

संत भूमी म्हणून संपूर्ण महाराष्ट्रातील मंगळवेढा परिचीत आहे. हजारो वर्षांपासून मंगळवेढा या नगरास एक भव्यदिव्य ऐतिहासीक परंपरा लाभली असून महाराष्ट्रातील अनेक संत सज्जनांचा सहवास या नगरीला लाभला आहे. याच संत परंपरेतील स्त्री संत कान्होपात्राचे वास्तव्य मंगळवेढयामधे अनेक वर्षे असल्याचे दिसते.

## *प्रस्तावना :*

## *पूर्वायुष्य :–*

कान्होपात्राने आपले संपूर्ण जीवन विठठल भक्तीत घालविले. तिचा जीवन चारित्र्याविषयी व साहित्याविषयी फारशी व पुरेशी माहिती वाचकांना मिळत नाही. कान्होपात्रा ही मंगळवेढयातील शामा नायकीणीची मुलगी. ती वयात आल्यावर तिच्या आईस वाटे कान्हुनेसुद्धा मृाझ्यासारखे नाचगाणे करावे. परंतू कान्होपात्रेस आपले आईचे वागणे पटत नव्हते. ती सदैव पांडुरंगाचे भक्तीप्रेमात रंगून जायची. कान्होपात्रेच्या देखणेपणाची कीर्ती बिदरबादशाहचे कानावर गेली. आपले जनानखान्यात अशी सुंदर कामिनी असावी म्हणून बादशहाने पठाण घोडेस्वार कान्होपात्रेस आणण्यासाठी मंगळवेढयास पाठविले. आपणांस धरणे आले म्हणून ती भितीने गांगारुन गेली. व सर्वांची नजर चुकवून वारकृयांसोबत दिंडीत सामील होवून पंढरपूरास गेली. गाभृाऱ्यात जावून तिने श्री विठठलाचे चरणास मिठी मारली व आर्तस्वराने पांडुरंगाचा धावा केला. हे भक्तवत्सल तूच मला या असूरी संकटांतूनच वाचव. तुझ्याशिवाय या तिन्ही त्रिभुवनात मला कोणी वाली नाही. तिने पांडुरंगाचे मुखकमलाकडे पहात आपले प्राणज्योत पांडुरंगाचे चरणी विलीन केले.

कालांतराने कान्होपात्रेच्या समाधीवर एक तरटी वृक्षाचे झाडू निव्वळ काळया पाषाणांवर उगविले. शके 1200 शतकात ही घटना घडली तेंव्हापासून आजतागायत हे काळया पाषाणांवरील तरटी वृक्षांचे पाण्याशिवाय हिरवेगार झाड कान्होपात्रेच्या भक्ती प्रेमाची जीवंत साक्ष देत श्री विठठल मंदिराचे दक्षिणद्वारी दिमाखात उभे आहे. भक्ती करावी तर माझ्या कान्होपात्रे सारखी अशा थोर संतांचे पदस्पर्शाने व वास्तव्याने पुनित झालेल्या मंगळवेढेत श्रीमंत दामाजीपंत होवून गेले.

## *उद्दिष्टये :–*

(1)कान्होपात्राच्या चारित्र्यांची माहितीवर अधिक प्रकाश टाकणे.
(2)त्यांनी समाजांमध्ये एक महत्त्वाचे काम केले ते म्हणजे एक गणिकेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला.
(3)तत्कालीन सामाजीक जिवन व विचार याचा आढावा घेणे.
(4)कान्होपात्रेने आपल्या अभंगामधून लोकांना समाजजीवनाचा व नित्तांत भक्तीचा मार्ग दाखविला त्या अभंग साहित्याचा अभ्यास करणे.

## कान्होपात्रा चारित्र :–

विठठल भक्तीचा लखलखीत अविष्कार घडविणाऱ्या कान्होपात्रेविषयी फार कमी माहिती उपलब्ध आहे. त्यांनी विविध अभंगाची रचना केली असावी पण ते लिहून ठेवणारे कोणी नव्हते. त्यामुळे त्यांचा खूप थोडे काव्य उपलब्ध आहे. पण त्यां जे भक्तीरसात पूर्ण अभंग उपलब्ध आहेत. त्यातल्या विठठल भक्ती अविष्काराने आपण दिसून जातो.

इतर विठठल भक्त व स्त्री म्हणून कान्होपात्राचे जीवन पूर्णतः भिन्न असल्याचे दिसते. शामा नावाच्या धनवान रुपसंपन्न गणिकेच्या पोटी तिचा जन्म झाला. ऐषोआरामी सुखभोगी वातावरणात ती वाढली. त्या घरात विठठल भक्तीची परंपरा असणं शक्यच नव्हतं. वेश्याकूळतल्या स्त्रीला गुरुतरी कुठला लाभणार पण गणिकेचा रुढ असा भोगविलाशी मार्गांकडे न जाता परमार्थ मार्गांकडे वळला आणि उतकट भक्ताने परमेश्वर स्वरुप पावली.

पंढरपूरपासून सात कोसांवर मंगळवेढे गावात धनाढय शामनायिकीनीची कान्होपात्रा ही मुलगी वडील अर्थांत कोणते माहीत नव्हतं पण शामचा असा अंदाज होता की गावाचा नगराध्यक्ष सदाशिव मालगुजर तिचा पती असावा. लहानपणीच तिच्या पायात बांधला गेलेला चाळ कोडकौतुकाचे नव्हते. तर वेशावृत्तीवर अपरिहार्य आसन नृत्य शिकण्यासाठी होते. रुप आणि तारुण्याच्या जोरांवर लोकांकडून पैसे वसूल करावेत असे वातावरण अवतीभोवती होत. आईचा आग्रह तसाच होता. पण भक्तीचा सूर तिच्या ह्रदयात फुटला होता. कान्होपात्रा रुपवती होती, बुद्धीमान होती. संत कान्होपात्राचा उल्लेख मेनका, अप्सरेचा अवतार असल्याचा उल्लेख अनेक लोककथामधून आल्याचा दिसतो. ती लोककथांमधून मावले गेले. गायन आणि नृत्यामध्ये अगदी लहान वयात प्राविण्य मिळविले होते. हळूहळू तिचं कलानैपुण्य आणि सौंदर्यांची कीर्ती दूरवर पसरली तिची आई अत्यंत धनवान गणिका होती. एखादया सरदाराच्या महला सारख्या त्याचा भव्य प्रसाद होता. अनेक दासी तिच्या सेवेत तात्पर्य होत्या. शामाने कान्होपात्रेच्या शिक्षणाची चोख व्यवस्था केली होती. कान्होपात्रेने आपला गणिका व्यवसाय पुढे चालू ठेवावा राजदरबारी रुजू व्हावं असं शामा नायकीणीस वाटत होतं. तर कान्होपात्राला त्याची किळस वाटत होती. कान्होपात्राने आईला स्पष्ट सांगितलं की, माझ्यापेक्षा रुपवान पुरुष असेल तर मी त्याच्याजवळ राहेन, विवाह करेन. ही अट अर्थात कठीण होती. मंगळवेढयाचा नगराध्यक्ष मालगुजर यांची नजर कान्होपात्रेवर पडली त्यांनी कान्होपात्रेचे नाच गण बहाण्यांची इच्छ व्यक्त केली. शामाने काहीतरी सांगून कान्होपात्रेला कसंबसं सदाशिवसमोर आणले त्यांची विषारी नजर कान्होपात्रेवर पडली. यांच्यासारख्या नीच माणसाचा इच्छेखातर आपण गायननृत्य करणार नाही. असं तिनं त्यांच्यावर तोंडावर सांगितलं. भडकलेले नगराध्यक्षाने सूडसत्र सुरु केले. ती त्यांची मुलगी असल्याचं शामाने सांगून पाहिलं. पण तो इतका वासनांधझाला होता की, हे खोटं असल्याचं त्यांने म्हंटले. शामा आणि कान्होपात्रेचा छळ सुरु झाला. विरोध न्याय कोण देणार. अखेर शामाने त्यांची माफी मागितली. त्याने तीन दिवसात कान्होपात्रेला आपल्या समोर आणून उभे करण्याचा हुकूम दिला. या संकटाने कान्होपात्रा डगमगली नाही ती देवांसमोर हात जोडून जप करतच होती. पहाटे डोळा लागला आणि भजन टाळांचा गजर ऐकून कान्होपात्रेला जाग आली.

वारकऱ्यांचा एक जथा आषाढी निमीत्त भजन गात पंढरपूरात चालला होता. त्या क्षणी मनातला अस्पष्ट विचार तिने पक्का केला तिची म्हातारी दासी हौसा वारकरी होती. बळजबरी अत्याचारांतून सुखाची संधी जणू देवाने तिला दिली होती. हौसाच्या संगनमताने तिने फाटके–विटके कपडे घातले आणि ती पंढरपूरला निघाली. तिच्या मनाला विठठलाची ओढ लागली मध्य रात्रीच्या अंधारात एका दासीच्या वेशेत तिने मंगळवेढे सोडले. पंढरपूरला आल्यांवर तिने पांडुरंगच दर्शन घेतला आणि त्यावेळी ती संपूर्णपणे त्यांच्या चरणाशी एकाग्र झाली व्याकूळ भावनेने ती विठठलाची विनवणी करु लागली.

मज अधिकार नाही<br>
भेटी देई विठाबाई<br>
डाव देई चरणापाशी<br>
तुझी कान्होपात्रा दासी

आपलं सगळं अस्तित्व विठोबाच्या पायी समर्पित करुन तिने त्याचं दायित्व पत्करलं का पात्रा स्वाराचित अभंग गाऊ लागली आणि तिचा स्वर्गीय आवाज ऐकून हाजारो वारकरी तल्लीन झाले तिथे येणारे सारे विठ्ठलावरच्या प्रेमामुळेच येत होते. त्या अभंगातला भाव त्यांच्या हृदयाला भिडला वृध्द हौसाबाईने कापात्रेसाठी आणि स्वतःसाठी एक झोपडी बांधली कोन्होपात्रा दिवसातून दोनदा विठ्ठलाचे देऊळ झाडून पुसून स्वच्छ करत असे. पहाटे आणि रात्री ती देवासमोर वेड घेतलेली गरीब शेतक–याची पोर आहे. कान्होपात्रा दिवसेंदिवस विठ्ठल भक्तीच्यासागरात खोल बुडत गेली. लोक तिचा आदर करु लागले. भोग विलासाची इच्छा तिला नव्हतीच मूळची ओढच परमार्थाकडे असल्याने तिच्या ध्यानी मनी विठ्ठल राहू लागला. मन त्याच्या चरणाशी एकाग्र होऊ लागले. त्याची भेट व्हावी म्हणून तळमळ होऊ लागली.

।।जिवाचे जिवलग माझे<br>
कृष्णाई, कान्हाई

सावळे डोळसे करुणा
येथू देई काही ।।

अशी आर्त विनवाणी उमटू लागली. कालांतराने सर्व सुखाचे जे निजसुखाचे सारंगे माय तो हा पंढरीराय विटेवरी असा समाधानाचा शांतीचा भाव मनी उपजला विठ्ठलाचे चरण हे आत्मा सुखासमान आसमान असल्याने सर्व इच्छा वासना निर्मल्या इकडे नगरप्रमुखावर खवळलेल्या लोकांनी त्याच्या घराला आग लावली पण तो निसटून बादशहाकडे गेला. बादशाहाच्या सहाय्याने त्याने लोकांवर सूड उगवला. त्यांच्या घरादारावर नांगर फिरवला. त्यांना पकडून तुरुंगात टाकून हाल केले. आणि सर्वत्र वचक बसविला. नंतर त्याने कान्होपात्रेचा पत्ता मिळवला आणि तिच्या लावण्याच वर्णन करुन तिला जनानखाण्यात दाखल करण्यात पुजाऱ्यावर फर्मान बजावले कि त्यांनी कान्होपात्रेला स्वाधीन करावे नाही तर मंदिर जमीनदोस्त करण्यात येईल. विठ्ठल मंदिराला सैनिकांचा गराडा पडला आपल्यासाठी लाखेच भक्ती स्थान असलेल सारसर्वस्व विठ्ठलाच मंदिर उदवस्त व्हाव हे तिला सहन होन शक्य नव्हते. कान्होपात्रा तडक देवा समोर हात जोडून उभी राहीली. देवापासून दूर जाण्याची कल्पना तिच्यासाठी असहाय्य होती ती देवाला म्हणाली –

।।नको देव अंत असा पाहू
प्राण हा सर्वस्व फुटो पाहू
हरिणाचे पाड व्याघ्रे धरीयले
मजलागी जाहिले तैसे देवा
तुजविणे डाव दिसे त्रिभुवनी
धावे जो जननी विटाबाई
मोकूळूनी आस झाले मी उदास
घेई कान्होपात्रेस हदयास।।

परमेश्वराची आर्तव्याकूळ विनवणी करत असलेला अभंग तिचा आवाज सर्वत्र भरुन राहिला. आपल्या उत्कट भक्तीने चराचर चैतन्यशील जोडली गेली आणि अखेर त्याच ईश्वराच्या चैतन्याशी एकरुप झाली. आपल्या विठ्ठलाच्या पायाशी तिने देह ठेवला. एक अख्यायिका अशी की त्यावेळी चंद्रभागेला प्रचंड पूर आला सार यवन सैन्य वाहून गेला. विठ्ठल मंदिरही जलमय झाल, चंद्रभागेत त्या एका खडकाळ जागी आदी तिचे शरीर अडकले मग ते महासागराच्या खोल तळाकडे चंद्रभागाने वाहून ज्या खडकाळ जागी काळीकाळ अडकले होते तिथे एक तरटी वृक्षाचे रोप उगवल्याचं आढळलं तो अक्षय तरटी वृक्ष आजही कान्होपात्रेच्या विठ्ठल भक्तीची ग्वाही देत तेथे उभा आहे. कान्होपात्रेने स्वतःला देवाची वधू मानवल तरी तिचा विठ्ठल तिच्यासाठी आई सारखा होता. मायबाप बंधू भगिनी होता. देहाच्या उपाधी सुटाव्या म्हणून देवाकडे प्रार्थना करते. कान्होपात्रेला काय हावं होत –

देगा प्रेमळकळा नाम तुझे विठ्ठल
तिच्या कानवाळू मायमाऊली होता

दासाची कळकळ वागवणारा दिनाचा नाथ कृपावंत मालक होता. भक्तांचा दास होता, ज्याच्या प्राप्तीसाठी चारीवेद सहा शास्त्रे शिकली तरी तो केवळ भक्तीने प्राप्त होतो. आगावैकुण्याचा राया आग विठ्ठल सखा अशी आर्त हाक ती त्याला आपल्या संरक्षणासाठी मारत होती. कान्होपात्रेच्या भक्तीने अखेर तिला सर्वातून मूक्ती मिळाली. विठ्ठलाचे पाय न सोडता त्याच्या चरणी सहज चरणी देह त्याग घडावा हे परकोटीच्या भक्ती खेरीज अशक्य होत कुणी गुरु नाही. काही परंपरा नाही भक्तीच वातावरण नाही अशा पारिस्थितीत केवळ आपल्या भक्तीने तिने ईश्वर प्राप्ती करुन घेतली म्हणून कान्होपात्रा अद्वितीय ठरते. तिच्या भक्तीमुळे समाजही तिच्या पायाशी नतमस्तक झाला भक्तीला संतपद मिळाले.

***निष्कर्ष :–***

संताची भूमी म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात मंगळवेढा परिचीत आहे. हजारो वर्षापूर्वीपासून या नगराला एक प्राचीन ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. लोकांना कान्होपात्र्यांच्या चरित्र्यांची माहिती यामधून मिळते. त्यांनी समाजामध्ये एक महत्वाचे काम केले ते म्हणजे एक गणिकेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. कान्होपात्रा एका गणिकेची मुलगी असल्यामुळे तिला देवळात जाण्यास मनाई होती. पण तिने समाजाचा विचार न करता विठ्ठल मंदिरात प्रवेश केला व ती परंपरा मोडली.

तिला भोग विलासाची इच्छा नव्हती तिची ओढ परमार्थाकडे होती. तिने समाजाला दाखून दिले होते की एक गणिकेची मुलगी सुध्दा देवाची भक्ती संपूर्ण मनापासून करु शकते. व मोक्ष प्राप्त करु शकते. कान्होपात्राने आपल्या

अभंगामधून लोकांना चांगली शिकवण दिली.

**संदर्भ साधने :–**

*(1)श्रोतीय, पदमावती, संत चोखामेळा आणि परिवार  विवेचक अभ्यास, (समीक्षात्मक ग्रंथ पीच.डी प्रबंध) गोकुळ मासिक प्रकाशन, पुणे, 1997*
*(2)सकल संतवाणी, मराठी खंड पहिला, गीताप्रेस, गोरखपूर, 1999*
*(3)माटे श्री.म. संत पंत आणि तंत लेख, ठोकळ प्रकाशन, पुणे 1950*



***भाग्यश्री पांडुरंग जाधव***
बी. ए. भाग ३ , इतिहास विभाग , श्री संत दामाजी महाविदयालय.